वि.दि.मु.क्र.३०७/२०१८
(MHST05-000613-2018)
डॉ. सुमन जगदाळे व इतर.
वि.
कुशंक चव्हाण व इतर

## निशाणी २९ वरील आदेश

सदरहू अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ अन्वये अर्जात दुरूस्ती करण्याकरीता दाखल करण्यात आला आहे.

**अर्जातील कथन थोडक्यात असे की,**

०२. वादीने सदरचा दावा हा वाटपाकरीता व निरंतर ताकीदीकरीता दाखल केला आहे.

०३. वादींचे कथन आहे की, सदरचा दावा संगणीकृत करताना अनावधानाने टंकलेखनामध्ये चूक झाली आहे. सबब, सदर दाव्याचे कामी दुरूस्ती करणे आवश्यक झाले आहे. सदरील दुरूस्ती खालीलप्रमाणे आहे.

| मूळ दाव्यातील मजकूर | प्रस्तावित दुरूस्ती |
|---|---|
| दावा कलम १(अ)(२) या मिळकतीचा गट क्र. ११६८ ऐवजी | गट क्र. १६८ |
| कलम ९ मधील ओळ क्र. २ मधील ७/९० | १/१० |
| ओळ क्र. ३ मध्ये ७/३० | ३/१० |
| कलम ९, ओळ नं. ३ मध्ये घर मिळकतीच्या पुढे | '३/५' |
| दावा कलम १० मधील आकारणीमध्ये १०८–८० ऐवजी | '१३९.२०' |
| वर्णनात ७/३० ऐवजी | '३/१०' |
| रू. १.३६ ऐवजी | '१.७४' |
| ८० पट रू. १०८.८० ऐवजी | '१३९.२०' |

| | |
|---|---|
| आकारणीमध्ये वादीचे ७/३० ऐवजी | '३/५' |
| हिश्याची किंमत रू.१,५८,७६४=२० ऐवजी | रू.'४,०८,२५०=८०' |
| एकूण रू.५,१८,८७३ ऐवजी | रू.'७,६८,३९०' |
| विषयाची किंमत १.३६ ऐवजी | '१=७४' |
| वि.किंमत ५,१९,०३६=२० ऐवजी | 'रू.७,६८,५९८=८०' |
| कलम १४ मध्ये कलम (अ) मध्ये पहिली ओळ कलम १ ऐवजी | १ अ आणि'' |
| तिन्ही वादींचा ७/३० ऐवजी | '३/१०' |

वरीलप्रमाणे बदल करून कलम १४ (ब) चे कलम २ चे अगोदर दावा कलम '१ब' असा मजकूर वाढविण्यात यावा अशी विनंती केली आहे. सदरील दुरूस्त्या या हस्तदोष व अनावधानाने झालेल्या आहेत. सदर दाव्याची अद्याप परिणामकारक चौकशी सुरू झाली नाही. सबब, न्यायाच्या दृष्टीने अर्ज मंजूर करण्यात यावा अशी वादीने विनंती केली आहे.

०४. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जास निशाणी ५३ वर आपले म्हणणे दाखल करून हरकत घेतली आहे. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार वादीने जाणूनबूजून उशीराने दावा दुरूस्तीचा अर्ज दिला आहे. यापूर्वीच वादीने निशाणी ५ वर युक्तीवाद करून तुर्तातूर्त ताकिद मिळवलेली आहे. निशाणी ५ चा युक्तीवाद व आदेश हे ऑक्टोंबर २०१९ मध्ये झाले आहेत. निशाणी ५ मध्ये सर्व दावा मिळकतीवर प्रतिवादीस ताकीद दिली आहे. त्यामुळे इतक्या उशीराने वादीस दावा दुरूस्त करून मागता येणार नाही. तसेच झाल्यास प्रतिवादीवर अन्याय होणार आहे. तसेच न्यायालयाने दि. ०७.०७.२०२० रोजी मुद्दे काढले आहेत. सबब, वादीचा अर्ज रद्द होण्यास पात्र आहे. वादीने दावा दुरूस्तीचा अर्ज देण्यास उशीर झाल्याबाबत कोणतेही सबळ कारण दिलेले नाही. वादीने जाणूनबूजून कामकाज लांबविण्यासाठी दुरूस्तीचा अर्ज दिला आहे. वादीने चुकीच्या मिळकतींवर व चुकीची कथने करून अंतरीम ताकीद मिळवली असल्याने वादीस अशा प्रकारची दुरूस्ती

मागता येणार नाही. सबब, वरील कारणांचा विचार करता सदरील दुरूस्ती अर्ज फेटाळण्यात यावा व सदर अर्ज मंजूर केलेस प्रतिवादी क्र. १ व २ यांना रक्कम रू.१५,०००/– इतका खर्च लावण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०५. दोन्ही विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. अर्जदाराचे वकीलांनी त्यांचे अर्जाप्रमाणे युक्तीवाद केला. युक्तीवादाच्या अनुषंगाने संचिकेचे अवलोकन केल्यास हे स्पष्ट होते की, प्रस्तावित दुरूस्ती ही तांत्रीक स्वरूपाची असून नजरचुकीने टंकलेखनातील चुकीमुळे करावी लागत आहे. जर ही दुरूस्तीची परवानगी दिली नाही तर दाव्यातील मजकूरांचे आधारे होणारे न्यायनिर्णय चुकीचे ठरणार आहे. सदर दुरूस्तीने अर्जाच्या मूळ स्वरूपात कोणताच बदल होत नाही. त्यामुळे, प्रतिवादींचे पैशाने न भरून येणारे नुकसान होणार नसून उलट दावा गुणावगुणावर चालविण्यास मदतच होणार आहे. त्यामुळे, अर्ज मंजूर होण्यास पात्र असल्याचे निष्कर्षास मी येत आहे. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज (निशाणी ५०) रक्कम रू.२,०००/– खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ व २ यांना खर्चाची रक्कम समान देण्यात यावी.

३. वादी यांनी प्रस्तावित दुरूस्ती १४ दिवसांच्या आत अथवा पुढील तारखेपर्यंत करून घ्यावी व सोबत दुरूस्ती अर्ज सादर करावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SABINA ALTAF MALIK
Date: 2022.04.30 13:14:38 +0530

ठिकाणः कराड ( सबीना अ. मलिक )

दि. २१ एप्रिल, २०२२ दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, कराड